# जिल्हा परिषद, पालघर, शिक्षण विभाग (प्राथमिक)
## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना

क्र.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतंर्गत पंचायत समिती तलासरी येथे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर एक डेटा एन्ट्री ऑपरेटर पद भरण्याकरीता अर्ज दि.9 / 9 /2026 ते दि.22/09/2026 पर्यंत मागविण्यात येत आहेत. विस्तृत जाहिरात व अर्ज प्रारुप zppalghar.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दि.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पालघर
तथा सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,पालघर
तथा अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती

Scanned with CamScanner

जाहिरात क्रमांक :- 01

# जिल्हा परिषद, पालघर, शिक्षण विभाग (प्राथमिक)

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतंर्गत कंत्राटी तत्वावर डेटा एन्ट्री ऑपरेटर भरती-2026

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत जिल्हा परिषदे अंतर्गत पंचायत समिती तलासरी तालुकयातील रिक्त असणारे डेटा एन्ट्री ऑपरेटरची पद तात्पुरत्या स्वरुपात पुढील 11 महिन्याचे कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर भरण्याकरीता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याकरीताच्या पात्रतेच्या व भरती प्रक्रियेच्या अटी खालील प्रमाणे राहतील.

1. **मासिक एकत्रित परिश्रमिक (मानधन)** :-प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतंर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचे मानधन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 2022/प्र.क्र.40/एस.डी.3 दिनांक 13 सप्टेंबर 2024 नुसार रक्कम रु. 25,000/- प्रमाणे देय राहील. त्यातून नियमाप्रमाणे कपाती लागु राहतील.

2. **शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता** :- 1) किमान पदवीधर असावा 2) मराठी टायपिंग 30 श.प्र.मि. 3) इंग्रजी टायपिंग 40 श.प्र.मि. 4) MS-CIT किंवा केंद्र शासनाची या संदर्भात तुल्यबळ संगणक परीक्षा उत्तीर्ण असे बंधनकारक आहे.

3. **वयोमर्यादा** :-31/12/2026 अखेर सदर पदासाठी किमान 18 वर्ष व कमाल 35 वर्ष असणे बंधनकारक आहे.

4. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा.

5. **निवडपध्दती** :- महाराष्ट्र शासन, शालेय व क्रीडा विभाग व क्रीडा विभाग याचा शासन निर्णय क्रमांक शापोआ 2019/प्र.क्र.74/एसडी -3 दिनांक 29 ऑक्टोबर 2020 अन्वये खालील प्रमाणे निवड पध्दती.

अ) डाटा एन्ट्री ऑपरेटरर्स पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास इ. 10 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इ. 12 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढण्यात येईल. तसेच एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला 10 गुण बोनस देण्यात येतील.

ब) अनुक्रमांक "अ" मध्ये विशद केल्या प्रमाणे गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परिक्षेकरीता एका पदासाठी गुणानुक्रमे 12 (1:12) उमेदवार याप्रमाणे बोलावण्यात येतील. सदर उमेदवारांची मराठी टायपिंग- 30 शब्द प्रतिमिनिट व इंग्रजी टायपिंग- 40 शब्द प्रतिमिनिट आणि संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल. यासाठी सर्व मिळून 100 गुण देण्यात येतील. सदर प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये किमान 50 गुण प्राप्त होणारे उमेदवार "डाटा एन्ट्री ऑपरेटर्स" च्या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

क) उमेदवारास संगणक परिक्षेमध्ये मिळालेल्या गुण (100 पैकी) व अनु. क्र. "अ" प्रमाणे शैक्षणिक पात्रतेबाबत मिळालेल्या गुणांची बेरीज करुन एकुण गुण देण्यात येतील, व यानुसार उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्याप्रमाणे तेवढ्याच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

6. **उमेदवारासाठी सुचना :**

6.1 उमेदवारांनी विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज (सोबत परिशिष्ट- अ )सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटांवर "डेटा एन्ट्री ऑपरेटर" पदाकरिता अर्ज असे नमूद करावे. उमेदवाराने अर्ज सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पालघर यांचे कार्यालयातील **"शालेय पोषण आहार कक्षात"** समक्ष किंवा अंतिम दिनांकाच्या पुर्वी पोस्टाने पोहोच (सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत.

Scanned with CamScanner

6.2 अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, संदर्भातील कागदपात्रांच्या झेरॉक्स प्रती स्वसाक्षांकित करुन जोडाव्यात.

6.3 अर्ज करण्याची अंतिम तारीख 22/09/2026 असेल यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. व सदर अर्जाचा भरतीकरीता विचार केला जाणार नाही. याचा उमेदवारांनी नोंद घ्यावी.

6.4 उमेदवाराचा नियुक्ती कालावधी 11 महिन्याचा राहिल व 11 महिन्यानंतर उमेदवाराचे काम समाधानकारक असल्यास नियमा नुसार एक दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देवून पुर्ननियुक्ती देणबाबत विचार केला जाईल.

6.5 नियुक्ती पुर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहीत नमुन्यात रु. 100/- चे स्टॅम्पपेपरवर (परिशिष्ट-ब) करारनामा (बंधपत्र) करुन घेण्यात येईल. आणि त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

6.6 भरती प्रक्रियेबाबत तसेच उमेदवार पात्र व अपात्रता बाबतचा अंतिम निर्णय हा निवड प्रक्रिया समितीचा राहील.

6.7 कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

6.8 डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही.

6.9 परिपूर्ण अर्ज सादर करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. अपूर्ण माहिती असलेले अर्ज, आवश्यक कागदपत्र, अर्ज स्विकारले जाणार नाही. उमेदवारानी अर्जासोबत सादर केलेली मुळ कागदपत्रे संगणक परिक्षेच्यावेळी तपासण्यात येतील.

6.10 प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी येतांना आधार कार्ड, निवडणूक अयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायन्स यापैकी किमान 1 मुळ ओळखपत्र व छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

6.11 पात्र उमेदवारांची संगणक प्रात्याक्षिक व मराठी, इंग्रजी टंकलेखन परिक्षाही संगणकीय प्रणाली मार्फत घेण्यात येईल.

6.12 सदर भरतीची प्रक्रीया पूर्ण झालेनंतर एक वर्षाच्या आत एखादया ठिकाणी कंत्राटी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्याने पदरिक्त झालेस प्रतिक्षाधिन यादीवरील गुणागुक्रमा नुसार पुढील उमेदवारास नियुक्ती नियुक्ती दिली जाईल. प्रतिक्षाधिन यादी एक वर्षासाठी ग्राहय धरणेत येईल.

6.13 सदर परीक्षेस बसण्यासाठी पात्र उमेदवाराची यादी जिल्हा परिषदेच्या संकेत स्थाळावर प्रसिध्द करण्यात येईल.

6.14 भरती संबंधित नविन सुचना, परीक्षेचा दिनांक, वेळ व स्थळ, सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराची गुणानुक्रमे यादी याबाबत ची सर्व माहिती जिल्हा परिषदेच्या zppalghar.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. अर्जदाराला व्यक्तीशः संपर्क केला जाणार नाही.

Scanned with CamScanner

अर्जदाराने वेळोवेळी संकेत स्थळावर भेट देवून अद्यावत माहिती प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

| | |
|---|---|
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, पालघर<br>तथा सदस्य सचिव<br>जिल्हा निवड प्रक्रिया समिती | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद,पालघर<br>तथा अध्यक्ष<br>जिल्हा निवड प्रक्रिया समिती |

Scanned with CamScanner

## (परिशिष्ट- अ)

## जिल्हा परिषद, पालघर,शिक्षण विभाग (प्राथमिक),

### प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतंर्गत डेटा एन्ट्री ऑपरेटर ऑपरेटर भरती-2026

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक .......................... दिनांक ..............................

प्रति,

सदस्यसचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पालघर

| उमेदवाराचा अलिकडच्या कालातील पासपोर्ट साई फोटे |
|---|

विषय :- प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना सन - 2026
डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज.

1. उमेदवाराचेनाव :- श्री./श्रीम. ..........................................................................................
   (आडनाव) (स्वत:चेनांव) (वडीलांचे /पतीचेनाव)

2. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ..........................................................................................
   ..........................................................................................
   ..........................................................................................

3. जन्मतारीख (शालान्त प्रमाणपत्रानुसार) :- ..........................................................................

4. प्रवर्ग :- ..........................................जात :-.........................................

5. ईमेलआयडी :- ..........................................................................................

6. मोबाईल नंबर :- ..........................................................................................

7. वय (दिनांक 31/12/2026 रोजी) .................. वर्ष ..................महिना..................दिवस

8. अर्जदाराराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा मंडळ / विद्यापिठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 10 वी | | | | |
| 2. | 12 वी | | | | |
| 3. | पदवी | | | | |
| 4. | मराठी टंकलेखन | | | | |
| 5. | इंग्रजी टंकलेखन | | | | |
| 6. | एम.एस.सी.आय. टी. | | | | |

Scanned with CamScanner

9. अर्जा सोबत सादर करावयाचे प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती * (आवश्यक)

| अ.क्र. | सादर करावयाचे प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती | |
|---|---|---|
| 1. | आधार कार्ड. | |
| 2. | जन्माचा दाखाला / शाळा सोडल्याचा दाखला. | |
| 3. | 10 वी गुणपत्रिका व प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| 4. | 12 वी गुणपत्रिका व प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| 5. | पदवी गुणपत्रिका व प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| 6. | मराठी टंकलेखन गुणपत्रिका व प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| 7. | इंग्रजी टंकलेखन गुणपत्रिका व प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| 8. | एम.एस.सी.आय. टी. गुणपत्रिका व प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| 9. | अधिवास प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |

**प्रतिज्ञापत्र**

मी शपथपुर्वक प्रमाणित करतो / करते की,

1. सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे.
2. माझी यापूर्वी कोणत्याही सिदध अपराध गुन्ह्यात सहभाग नाही अथवा अशा गुन्ह्याबाबत शिक्षा किंवा न्यायालयात खटला प्रलबित नाही.
3. शासनातर्फे होणा-या कोणत्याही परिक्षेत गैरप्रकाराबद्दल मला परिक्षस बसण्यास अपात्र किंवा काळया यादीत टाकलेले नाही.
4. मी कोणत्याही जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत येथे सदस्य म्हणून नियक्त नसुन या पैकी कुठल्याही संस्थेसोबत माझे व्यावयिक (पुरवठादार / कंत्राटदार) संबंध थेट किंवा भागीदारीत नाहीत.
5. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड कोणत्याही टप्पावर रद्द करण्यात येईल. व माझ्या विरुध्द नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक :-

स्थळ :-

**(उमेदवाराची स्वाक्षरी)**

साक्षीदार :- नाव:-

सही:-

Scanned with CamScanner